# भुयारी मेट्रोच्या कामात कामगार सुरक्षेवर भर

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कुलाबा - वांद्रे - सीप्झ या पहिल्या वहिल्या मुंबई भुयारी मेट्रो - ३ प्रशासनाने येथे काम करत असलेल्या कामगारांच्या सुरक्षेवर अधिकाधिक भर दिला आहे. विशेषत: कोरोना काळात येथील कामगारांना आरोग्यविषयक धडे देण्यात आले आहेत. शिवाय सातत्याने वैद्यकीय तपासणी केली जात आहे.

प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, कामगारांच्या कोरोना लसीकरणावर भर दिला जात आहे. या व्यतिरिक्त कामगारांची एचआयव्ही तपासणीदेखील केली जात आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन सुरुवातीपासून येथे काम करत असलेल्या कामगारांच्या आरोग्यविषयक सुरक्षेवर भर देत असून, कोरोना काळात यात आणखी वाढ करण्यात आली आहे. शिवाय काम करताना कामगारांना करमणुकीसाठी खेळासह छोटेखानी कार्यक्रमदेखील आयोजित केले जात आहे, असे कॉर्पोरेशनकडून सांगण्यात आले.